# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

## ~ विकसक नोंदणी प्रमाणपत्र देणे कामी निकष / अटी ~

उपअभियंता, प्रस्ताव शाखा, तांत्रिक विभाग :-

१) विकसकास बांधकामाचा / पुनर्वसन योजनेच्या बांधकामाचा किमान तीन वर्ष अनुभव असल्याचा पुरावा. पूर्ण केलेल्या बांधकामा संबंधित कागदपत्रे व माहिती.

२) ज्या वर्गामध्ये नोंदणी करावयाची आहे त्या वर्गाच्या वार्षिक उलाढालीच्या किमान मर्यादा रकमेच्या ५०% इतकी बांधकामे मागील तीन वर्षाच्या कालावधीत केल्याचा पुरावा.

३) विकसकाकडे उपलब्ध असलेल्या बांधकाम मशिनरी, साहित्याची यादी / भाडेकराराने घेतालेबाबातचे हमीपत्र तपासणे.

४) विकासकाकडे उपलब्ध असलेल्या कुशल / अकुशल कर्मचारी वर्गाची माहिती.

उपसंचालक लेखा, लेखा विभाग :-

१) मागील तीन वर्षाचे विकसकाचे / संस्थेचे / कंपनीचे ऑडीटेड बलेन्सशीट.

२) मागील तीन वर्षाचे विकसकाचे / संस्थेचे / कंपनीचे आयकर विवरण पत्र.

३) ज्या वर्गामध्ये नोंदणी करावयाची आहे त्या वर्गाच्या वार्षिक उलाढालीच्या किमान मर्यादा रकमेच्या १०% रकमेची राष्ट्रीयकृत / अधिसूचित (Nationalised / Scheduled) बँकेचे सोल्वन्सी प्रमाणपत्र.

४) विकसकाचे / संस्थेचे / कंपनीचे मागील तीन वर्षाचे वार्षिक उलाधालीबाबत सी.ए.चे प्रमाणपत्र.

५) विकसकाचे / संस्थेचे / कंपनीचे आर्थिक क्षमतेबाबत सी.ए.चे प्रमाणपत्र.

६) विकसकाचे / संस्थेचे / कंपनीचे आर्थिक क्षमतेबाबत राष्ट्रीयकृत / अधिसूचित (Nationalised / Scheduled) बँकेचे प्रमाणपत्र.

७) विकासक नोंदणी फी रु.१०,०००/- भरल्याची पावती.

**<u>विधी अधिकारी, कायदा विभाग</u> :-**

१) कंपनी अधिनियम, १९५६ च्या कायद्यानुसार संस्थेचे / कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र.

२) संस्था / कंपनी / फर्म मधील भागीदाराबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र.

३) महाराष्ट्र भागीदारी अधिनियमानुसार प्रमाणपत्र नसल्यास भागीदारी प्रमाणपत्र मिळणेकामी करण्यात आलेल्या अर्जाच्या अनुषंगाने प्राप्त होणारी पावतीची प्रत व त्याअनुषंगाने हमीपत्र.

४) झोपडपट्टीच्या जमिनीची मालकी विकसकाची असेल तर त्या प्रकरणात टायटल सर्च रिपोर्ट व तदअनुषंगिक कागदपत्र.

५) Litigation History इत्यादी.